# शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांसाठी काम करण्याची सुवर्णसंधी

## प्रतिनियुक्तीद्वारे पदभरती

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (NDKSP) २.०
## (कृषि विभाग, महाराष्ट्र शासन)

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (NDKSP) २.० हा महाराष्ट्र शासनाचा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. जो हवामान बदलामुळे शेतीत येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करतो. जागतिक बँकेच्या सहकार्याने या प्रकल्पाने शेतकऱ्यांसाठी हवामान लवचिकता निर्माण करण्याच्या पद्धतीत परिवर्तन घडवण्यात यश प्राप्त झाले आहे.

**या प्रकल्पाची मुख्य वैशिष्ट्ये :**

- **आधुनिक तंत्रज्ञान** : आयटी (IT) प्रणाली आणि एआय (AI) तंत्रज्ञान वापरून शेतकऱ्यांना हवामानाशी जुळवून घेण्यासाठी मदत करणे.
- **पाण्याचे योग्य नियोजन** : दुष्काळग्रस्त भागात पाण्याचा योग्य वापर करण्याबाबत आणि सूक्ष्म सिंचन वाढवण्याबाबत मार्गदर्शन करणे.
- **जमिनीची सुधारणा** : जमिनीची गुणवत्ता तपासणे आणि उत्पादन वाढवण्यासाठी मार्गदर्शन करणे.
- **आर्थिक मदत** : लहान शेतकऱ्यांना शेतीसाठी सहाय्य करणे.
- **शेतकरी गट** : कृषि व्यवसाय विकासाद्वारे शेतकऱ्यांना थेट सशक्त करणे.

**प्रकल्पाची व्याप्ती आणि यश:**

- हा प्रकल्प सध्या महाराष्ट्रातील २१ जिल्ह्यांमधील ७,२०१ गावांमध्ये राबविला जाणार आहे.
- मूल्यांकन अहवाल (ETR) नुसार, यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रकल्पाच्या प्रथम टप्प्यात पिकांचे उत्पादन वाढले आहे, शेती अधिक मजबूत झाली आहे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्नही सुधारले आहे.
- या प्रकल्पामुळे पाण्याचा कार्यक्षम वापर झाला आहे (४,३१,३२८ शेतकऱ्यांनी ठिबक/तुषार सिंचन वापरले), पिकांची स्थिरता वाढली आहे आणि चांगल्या बियाण्यांचा पुरवठा सुनिश्चित झाला आहे.
- जागतिक बँक, तसेच राष्ट्रीय व राज्य पातळीवरील विविध नामांकित संस्थांच्या सहकार्याने प्रकल्पाचे कामकाज पार पाडले जाते.

- हवामान अनुकूल शेतीसाठी राज्य स्तरावर राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत पुरस्कारप्राप्त झालेल्या प्रकल्पात आपणांस सहभागी होता येईल.

कृषि व पदुम विभागाच्या दि.५ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा- २ साठी पदे मंजूर करण्यात आली आहेत. खालीलप्रमाणे संवर्गनिहाय रिक्त पदांसाठी संबंधित संवर्गातील पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पदांचा संवर्गनिहाय तपशील**

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|---|
| | **प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, जागतिक व्यापार केंद्र, कुलाबा, मुंबई** | | |
| १. | मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्ग | प्रकल्प प्रशासन अधिकारी, कृषि व पदुम विभाग़ | ०१ |
| २. | मंत्रालयीन उच्च श्रेणी लघुलेखक संवर्ग | उच्च श्रेणी लघुलेखक, कृषि व पदुम विभाग़ | ०१ |
| ३. | महाराष्ट्र कृषि सेवेतील अधिक्षक कृषि अधिकारी संवर्ग | डिबीटी विशेषज्ञ | ०१ |
| ४. | महाराष्ट्र कृषि सेवेतील अधिक्षक कृषि अधिकारी संवर्ग | कृषि व्यवसाय विशेषज्ञ | ०१ |
| ५. | महाराष्ट्र कृषि सेवेतील कृषि उपसंचालक संवर्ग | क्षमता बांधणी तज्ञ | ०१ |
| ६. | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्ग | लेखा अधिकारी | ०१ |
| ७. | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहायक लेखा अधिकारी संवर्ग | सहायक लेखा अधिकारी | ०२ |
| ८. | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वरिष्ठ लेखापाल संवर्ग | उपलेखापाल/रोखपाल | ०२ |
| ९. | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील कनिष्ठ लेखापाल संवर्ग | कनिष्ठ लेखापाल | ०३ |
| **ब) विभागीय सह संचालक कार्यालय (छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, लातूर, नाशिक)** | | | |
| १० | महाराष्ट्र कृषि सेवेतील कृषि उपसंचालक संवर्ग | नोडल अधिकारी | ०५ |
| ११ | महाराष्ट्र कृषि सेवेतील गट-ब कनिष्ठ संवर्ग | प्रकल्प अधिकारी | ०५ |

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|---|
| **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय - २१ जिल्हे (छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, हिंगोली, नांदेड, अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, जळगाव आणि नाशिक)** | | | |
| १२ | महाराष्ट्र कृषि सेवेतील तंत्र अधिकारी गट-ब संवर्ग | नोडल अधिकारी | २१ |
| **उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय- २१ जिल्हयांतील सर्व ५५ उपविभाग** | | | |
| १३ | महाराष्ट्र कृषि सेवेतील उप कृषि अधिकारी संवर्ग | प्रकल्प सहाय्यक पर्यवेक्षक | ५५ |
| १४ | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्ग | लेखाधिकारी | ५५ |

**पात्रता:**

✓ शासकीय सेवेत कार्यरत अधिकारी

✓ संबंधित क्षेत्रात अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांना प्राधान्य

**का सहभागी व्हावे?**

☑ हवामान अनुकूल शेतीसंबंधी नामांकित प्रकल्पात काम करण्याची संधी

☑ नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान (AI, GIS, डेटा ॲनालिटिक्स) वापराचा अनुभव

☑ शेतकऱ्यांच्या जीवनात थेट सकारात्मक बदल घडविण्याची संधी

**अर्ज कसा करावा:**

सर्व इच्छुक अधिकारी यांनी आपला अद्ययावत सेवाधारित बायोडेटा व प्रतिनियुक्तीसाठी अर्ज खाली नमूद कार्यालयांत आपले कार्यालय प्रमुख यांचेमार्फ़त सादर करावा.

| अ क्र | पदनाम | अर्ज करावयाचे कार्यालय |
|---|---|---|
| १ | प्रकल्प प्रशासन अधिकारी, उच्च श्रेणी लघुलेखक (कृषि व पदुम विभाग) | प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई |
| २ | डिबीटी विशेषज्ञ, कृषि व्यवसाय विशेषज्ञ, क्षमता बांधणी तज्ञ, नोडल अधिकारी (विभागीय कृषि सहसंचालक-विभाग स्तर), नोडल अधिकारी (जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी-जिल्हा स्तर) | प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई |

| | | |
|---|---|---|
| २ | लेखा अधिकारी, सहायक लेखा अधिकारी | संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, म.रा., मुंबई |
| ३ | उपलेखापाल/रोखपाल, कनिष्ठ लेखापाल | सहसंचालक (लेखा व कोषागारे), कोकण विभाग़, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई |
| ४ | प्रकल्प अधिकारी (विभागीय कृषि सहसंचालक-विभाग स्तर) | आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, म.रा., पुणे |
| ५ | प्रकल्प सहायक पर्यवेक्षक (उप विभाग स्तर) | विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक, नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, लातूर यांचे कार्यालय |

📅 अर्ज सादरीकरणाची अंतिम मुदत : दिनांक १४.०८.२०२५